REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# चर्मकार समाज

डॉ. प्रतीक्षा गायकवाड
मराठी विभागप्रमुख , पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर.



महाराष्ट्र हा शेतीप्रधान देश आहे हे सर्वज्ञात आहेच स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामव्यवस्थेमध्ये गावगाड्याशी प्रत्यक्षात संबंधित १२ बलुतेदार आणि अलुतेदर पद्धती अस्तित्वात होती. अर्थातच हेच खरे गावकामगार होय. मात्र या पद्धतींच्या केंद्रस्थानी शेतकरी असल्याचे दिसून येते. शेतकरी हा धान्य पिकवित असे. मात्र जे शेतकरी नव्हते, ते शेतकऱ्यांना व इतरांना सेवा पुरवीत असायचे. यामध्ये शेतकऱ्यांच्या नैमित्तिक स्वरूपाच्या गरजा पुरवायचे अशांना ' अलुतेदार ' अथवा ' नारू ' म्हणून संबोधले जायचे. तर जे शेतकऱ्यांच्या नेहमीच्या व महत्त्वाच्या गरजा भागवायचे ते ' बलुतेदार ' अथवा ' कारू ' या नावाने ओळखले जाऊ लागले.

ग्रामीण संस्कृतीत जी १२ बलुतेदार पद्धती अस्तित्वात होती. त्यामध्ये मांग (मातंग), महार, चांभार, कुंभार, लोहार, सुतार, कोळी, गुरव, तेली, न्हावी, परीट, माळी इ. सारख्या जाती समाविष्ट होतात. तर अलुतेदारांमध्ये काही ठिकाणी १२ तर काही ठिकाणी १८ जातींचा समावेश होतो. त्या अशा कलावंत, घडशी, चौगुला , जेगम, ठाकर, डौरी, तराळ, तांबोळी, माळी, सोनार, चौगुला इ.[1]

चमत्कार समाज हा १२ बलुतेदारांपैकी एक असणारा असा समाज असून गावगाड्यातील इतर बलुतेदारांप्रमाणेच याही समाजाला एक स्वतंत्र पारंपरिक धंदा अथवा व्यवसाय आहे. चांभार, चम्हार, चमार, चर्मकार ही त्यांच्या व्यवसायावर आधारित म्हणजेच कार्यात्मक स्वरूपाची जात असून त्यांची संख्या मोठी असून ती सर्वत्र पसरलेली आहे. महाराष्ट्रात हा समाज ' चांभार ' किंवा ' चर्मकार ' या नावाने ओळखला जातो. तर उत्तर प्रदेशमध्ये त्यांना ' चमार ' असे म्हटले जाते. देशात या समाजाची सर्वाधिक लोकसंख्या उत्तर प्रदेशात आहे. तर गुजरातमध्ये हा समाज ' मोची ' समाज म्हणून ओळखला जातो. तर कोकण भागात ते ' चेवाली ' व ' दाभोळी ' या नावाने ओळखले जातात. भारतभर आढळणाऱ्या संख्यात्मकदृष्ट्या सर्वात मोठ्या जातींपैकी ही एक जात आहे. इ. स. १९११ च्या जणगणनेनुसार त्यांची संख्या ११ दशलक्ष होती, अर्थातच याची नोंद रसेल आणि हिरालाल यांनी घेतली आहे.[2]

संस्कृतमधील ' चर्मकार ' या शब्दापासून या जातीचे नाव आले आहे. या जातीचे मूळ संमिश्र जातीतून आले असल्याचे सांगण्यात येते, चांभरांना चांगले व्यक्तित्व व गोरा रंग असून सामान्यत: स्त्रिया

सुंदर असतात, अशी नोंद आहे. मात्र सर्वच चांभार गोरे नसून ते मध्यम ते कृष्णवर्ग असलेलेच जास्त आढळतात.

## चर्मकारांच्या पोटजाती -

चांभारात अनेक पोटजाती असून प्रत्येक पोटजातीच्या आतच विवाह होतो. छत्तीसगडचे सतनामी संप्रदायाचे चांभार अन्य पोटजातीत विवाह करीत नाहीत. अर्थातच ते फार पुरातन रहिवासी असावेत. याशिवाय कानौजिया आणि अहीरवार या पोटजातीही छत्तीसगडमध्ये आढळतात. महाराष्ट्रात बेरादिया आणि दखीनी ह्या विभागांवर आधारित पोटजाती आहेत. जैस्वार, भदोरिया, अंतवैदी, गंगापारी, देश किंवा देशवार, महोबिआ किंवा खैजरा तसेच गुजरातमधले लाडसे किंवा लाडवी ह्या सर्व विभाग आणि निवासाच्या प्रोतांपरत्वे पडलेल्या पोटजाती चांभार समाजात आढळतात. याशिवाय दाईजान्या (दाईचे कार्य), काटुआ/करावा (चामडे कापणारे) आणि गोबरधुवा (शेण गोळा करणारे) यापण पोटजाती आढळतात. तसेच चंद्रपूरकडे मांग्या, चांभार आणि दमोहकडे नोना चांभार (एका पुराणकथेतील आख्यायिकेतील नोना/लोना चांभारिण पासून झालेले) असेही प्रकार आढळतात.[३]

## चर्मकार समाजातील पंथ -

इतर जाती जमातींप्रमाणेच चर्मकार समाजातही तीनपंथ पहावयास मिळतात ते असे ' हरळे वैष्णव, रोहिदासी, लिंगायान ' इ. या पंथांमध्ये समाविष्ट असणारे लोक स्वतः ला विशिष्ट पथांचे म्हणवून घेतात. इतकेच नाही तर पंथांतील प्रत्येकजण स्वतः ला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजतो. याच कारणास्तव ते आपापसात रोटी - बेटी व्यवहार करत नाहीत. [4]

समाजात, अंशाच्या गळ्यामध्ये लिंगायत समजाप्रमाणे लिंग पहावयास मिळते.

## चर्मकारांची जात-पंचायत -

पूर्वीच्या काळी चर्मकार समाजात जात पंचायत अस्तित्वात होती. जातीचे पारंपरिक रीतिरिवाज आणि आतिअंतर्गत व्यवहार यावर पंचायतींचे काटेकोरपणे लक्ष असायचे. या पंचायतीच्या प्रमुख म्हणून या समाजातील प्रतिष्ठित व्यक्तीची निवड केली जात असे त्यालाच त्या काळात ' पाटील ' असे संबोधण्याची प्रथा होती. या जातीतील पुरुषांनी नियम मोडले अथवा स्त्रीचे पाऊल वाकडे पडले तर जात पंचायत संबंधित इसमाला जातीबाहेर टाकत असायचे. यालाच ' वाळीत टाकणे ' असे म्हणतात.

या समाजात जातीतील लग्न सोहळ्या प्रसंगी किंवा १० व्या व १३ व्या कार्याच्यावेळी जातपंचायतीचा प्रामुख्याने सहभाग असायचा. त्यांच्या उपस्थिती शिवाय लग्न कार्ये होत नसायची विशेषतः अशा लग्न कार्यात जातीतून बाहेर काढलेल्या, वाळीत टाकलेल्या लोकांना बोलावले जात नसायचे.

अलीकडच्या काळात या समाजात या प्रथा किंवा जातपंचायत अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास येते.

## चर्मकार समाजाची रूढी-परंपरा -

या समाजाची रूढी - परंपरा इतर जाती - जमातीपैकी भिन्न असल्याचे दिसून येते.

**नामकरण विधी -**

**साधारणतः बरी परिस्तिथी असलेल्या चांभार समाजामध्ये सुपात ठेवलेल्या तांदळावर नवजात बालकाला ठेवण्याची प्रथा आहे. ६ व्य दिवशी नामकरण विधी केला जातो. कधी - कधी १२ व्या दिवशीही नामकरण विधी केला जातो. मात्र १२ व्या दिवशी किंवा त्यानंतरच्या बाळाचे केस काढले जातात. यालाच जावळ काढणे किंवा मुंडनविधी असे म्हटले जाते. बाळाला व त्याच्या मातेला आंघोळ घालून तिला पूर्ण जेवण दिले जाते.**

**लग्न प्रथा -**

**चर्मकार समाजात एकाच कुळातील व्यक्तींमध्ये विवाह होत नाहीत. तर ते भिन्न कुळात होतात. तर काही भागांमध्ये मातेच्या कुळात तसेच दोन्ही आज्यांच्या कुळात विवाह करता येत नाही. अर्थात यांच्यामध्ये बालविवाहाची प्रथा नसल्यामुळे ते प्रौढपणीच होतात. तसेच या समाजात मला - मुलींचे आई - वडिलच मुलामुलींची निवड करताना दिसतात. चर्मकार समाजामध्ये वधुमुल्याची प्रथा असून २ पैसे पासून ते १०० रुपयांमध्ये ते देता येते. चंद्रपूरच्या भागात पूर्वी ही रक्कम ? १३ इतकी होती. त्यालाच हुंडा असे म्हटले जात असायचे.**

**विवाहप्रसंगी मुलाचा पक्ष व मुलीकडच्यांचे मित्र याच्यात लुटुपुटूची लढाई (बिलासपूर भागात) होत असायची. नंतर मुलाचा पक्ष छताला हात लावून लग्नमंडपात येत असायचा. त्यानंतर पाण्याने भरलेले मातीचे २ घडे जमिनीत पक्के करून त्यांच्यामध्ये वरवधूला उभे करून नातेवाईक या घटांमधले पाणी त्यांच्यावर टाकीत असायचे. नरसिंहपूरसारख्या काही भागात वधू - वरांना नांगराच्या फळावर बसवून लग्न विधी होतो. [5]**

**या समाजात विधवाविवाहास मंजूरी आहे. मात्र ती मृतपतीचा वडील भाऊ सोडून कोणाशीही लग्न लावू शकते. मात्र हा लग्न - समारंभ साध्या स्वरूपाचा असतो.**

**यांच्यात लग्न लावण्यासाठी प्रामुख्याने ब्राम्हणाची उपस्थिती महत्वाची असते. यांच्यात लहान सहान कार्यासाठी ब्राह्मण नसतो तर सवासा असतो. कुटुंब प्रमुखाच्या बहिणीचा नवरा, जावई किंवा आत्याचा नवरा अशाप्रसंगी सवासा म्हणून येतो.**

**पूजापाठ/धार्मिक वृत्ती -**

**चांभार, मोची हे हिंदू असून हिंदू-देव-देवतांची पूजा करताना दिसतात. त्यांची कौटुंबिक देवता माईर किंवा मारी असून घरातच मातीच्या पेंडाच्या स्वरूपात ती बसवलेली असते. सणाच्या दिवशी ते त्यांच्या ४ कातडे साफ करण्याच्या चाकूची (रांपी) ४ पोळया व नार अपूर्ण पूजा करतात.**

**बहुतेकदा चर्मकार समाजातील लोकांच्या घरामध्ये छोटे - मोठे देवघर अथवा देव्हारा आढळतो. त्यामध्ये देवदेवतांचे मुखवटे आणि संतपुरूषांच्या तसबिरी पहावयास मिळतात. ' योगीराज देवजीबाबा ' हे या समाजातील दैवत मानले जाते. पुण्यातील दारूवाला पुलाजवळ देवजी बाबांचा मठ आहे, असे सांगितले जाते. याखेरीज देवाजीबाबा धार्मिक संघटनाही असल्याचे आढळून आले आहे.(देवजीबाबा हे संत मलिकितील थोरपुरूष असून त्यांनी जिवंतपणे समाधी घेतल्याचेही सांगितले जाते.)**

पौष महिन्यात ' देवजीबाबा ' हरळ - वैष्णव संस्थांच्या वतीने महिनाभर धार्मिक सप्ताह पाळला जातो. यावेळी महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातून चर्मकार समाजाचे अनेक लोक या सप्ताहात सहभागी होण्यासाठी येतात. याकाळात धार्मिक कीर्तन, प्रवचन, पोथ्यापुराणांचे पारायण केले जाते.

पालीचा खंडोबा, जेजुरीचा खंडोबा, जावलीचे दैवत, मरीआई आणि काळूबाई, भैरोबा यांसारखी कुलदैवते चर्मकार समाजाने धार्मिक विधींसाठी स्वीकारलेली दिसून येतात.

## अंधश्रद्धा आणि नवस -

देवदेवतांच्या नावाने अंगारे - धुपारे (करण्याची), नवस करण्याची प्रथा या समाजात असलेली दिसून येते. विशेषतः या समाजातील स्त्रियांच्या अंगात काळूबाईंच्या देवीचं वार येतं. अशी कल्पना सांगितली जाते. काळूबाईची यात्रा वर्षातून एकदा मांढरे या गावी पौषपौर्णिमेला भरते. या यात्रेमध्ये चर्मकार समाजातील लोक मोठ्या प्रमाणात समाविष्ट होतात. या यात्रेला नवस फेडण्यासाठी कोंबडी आणि बाजरी यांचे बळी दिले जातात. ही प्रथा आजही चालू असल्याचे समजते.

चर्मकार समाजात महादेवाला अत्यंत पवित्र स्थान आहे. महाराष्ट्रात चर्मकार समाजाचे लोक स्वतः महादेवाचे भक्त असल्याचे अभिमानाने सांगताना दिसतात. यांच्या प्रत्येक कुटुंबात महादेवाची तसबीर असते. तर काही खेडेगावात आणि शहरी भागातही जेथे चर्मकार समाजाची वस्ती आहे, तेथे महादेवाचे मंदिर आढळतेच. हे लोक दरवर्षी महादेवाच्या नावाने भंडारा घालून उत्सव साजरा करतात.

## अंत्यविधी -

चांभार समजत मृतांना अग्नि देण्याची प्रथा आहे. ते १० दिवस सुतक पाळतात पण त्या दरम्यान डोक्यावर वस्त्र किंवा टोपी घालीत नाहीत. असा हा चर्मकार समाज अनेक रूढी - परंपरा उराशी बाळगून महाराष्ट्रातल्या खेड्या पाड्यात, शहरात मोठ्या संख्येने जगताना दिसतो आहे. पूर्वीपासून चालत आलेला चर्मकरितेचा व्यवसाय. हेच उपजीविकेचे प्रमुख साधन म्हणून आजही सांभाळण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

## चर्मकार समाजाची लोककथा -

या समजाच्या रूढी - परंपरा विषयी असे सांगितले जाते की, या समाजातील स्त्रिया पुरुषाच्या ताटातले उष्ट अन्न कधीही खात नसत. कारण त्या स्वतः ला राजकन्या समजतात. या संदर्भात एक लोककथा रूढ आहे ती अशी,

फार प्राचीन काळी कोण्या एका राजकन्येने असा पण केला की, ' आकाशातून पडणाऱ्या पुरुषाशीच मी लग्न करीन, अन्यथा करणार नाही. ' योगायोगाने एकदिवस राजकन्येच्या संस्थानातील एक चर्मकार तरुण नुकतेच सोललेले जनावराच कच्च कातड डोक्यावर घेऊन घरी येत होता. ते आकाशातून भक्ष्य शोधणाऱ्या घारीने पाहिले आणि तिने तरुणाच्या कातड्यावर झडप घातली. तो तरुण ते कातडे तसेच घट्ट धरून ठेवतो तेव्हा ती घार कातड्यासह त्या तरुणालाही उंच आकाशात उचलून नेते. थोड्यावेळाने तो तरुण घाबरून कातडे सोडून देतो आणि सरळ राजकन्येच्या राजवाड्यात येऊन पडतो. राजकन्येला अत्यानंद होतो आणि ती त्याला वरमाला अर्पण करते. तिचे लग्न होते. कालांतराने त्या तरुणाला त्याचा भूतकाळ आठवतो व तो राजकन्येला

स्वतः च्या जातीविषयी सांगतो तेव्हा राजकन्येला संताप येतो आणि ती त्याला शाप देते की, ' तुझ्या जातीतील स्त्रिया पुरुषाच्या ताटातील उष्टे अन्न कधीही खाणार नाहीत.'

## चर्मकारच्या व्यवसायाची उतरती कळा -

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये जसजसा शिक्षणाचा सर्वत्र प्रसार होऊ लागला तसतसा नवनवीन उद्योगधंद्यासाठी संधी उपलब्ध होऊ लागली. मात्र या काळात या जातीच्या पारंपरिक धंद्यांना उतरती कळा येऊ लागली. वाटा, स्वस्तिक या मोठमोठ्या चर्मोद्योजकांचे कारखाने निर्माण झाल्यामुळे खेडोपाड्यातील चर्मकारांच्या धंद्यावर त्याचा परिणाम झाला. त्यामुळे खेड्यातील या समाजाचे लोक शेती व्यवसायाकडे वळू लागले. तर काही लोक नोकरी धंद्याच्या निमित्ताने शहरात स्थायिक झाले. तर काही दुकानदारीकडे वळले.

## गटई कामगार -

या चर्मकार समाजात दुकानदारीशिवाय रस्त्याच्या कडेला बसून चप्पालबुट दुरुस्तीचे किरकोळ काम करण्याच्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. अशाप्रकारचे काम करणाऱ्यांना गटई कामगार असे म्हणतात.

गटई कामाकरीता चर्मकार प्रामुख्याने रांपी, आरी, हास्ति, इंगा, फरांडी, पलास्नी, आकर इ. सारख्या हत्यारांचा उपयोग करताना दिसतात. हे गटई कामगार शहराच्या विविध भागामध्ये झोपडपट्टीत राहताना दिसतात.

## चर्मकारांची सध्यास्तिथी -

महाराष्ट्रातील चर्मकार समाज आज मागासवर्गीयांच्या तुलनेने शैक्षणिक क्षेत्रात अधिक पुढे गेले असल्याचे दिसून येते. डॉक्टर, वकील, इंजिनिअर आणि प्राध्यापक होण्याकडे या समाजातील तरुणांचा काळ जाणवतो. विशेषतः शासनाकडून मागासवर्गीयांना मिळणाऱ्या सवलतीचा फायदा हा समाज घेताना दिसतो. पारंपरिक चर्मकाराच्या व्यवसायाबरोबरच या समाजाने शेती व्यवसायाकडे आणि शिक्षणाकडेही लक्ष पुरवले आहे. याच कारणास्तव या समाजाची आर्थिक स्थिती तर मागासवर्गीयांच्या तुलनेत बरी असल्याचे निदर्शनास येते.

अलीकडच्या काळात बदलत्या परिस्थितीनुसार या समाजात परिवर्तनाची प्रक्रिया होताना दिसते. अर्थातच महाराष्ट्रातील काही चळवळींचा परिणाम या समाजातील तरुणांवर आता जाणवू लागला आहे, असे म्हणता येईल. जातीय पारंपरिक धंद्यामुळे आर्थिक कुवत बरी असली तरी जातीचे सामाजिक स्थान बदललेले नाही, अस्पृश्य, खालच्या जातीचे म्हणून आजही ते उपेक्षित आहेत, किंवा त्यांना तशी वागणूक दिली जाते. अशीखंत या समाजातला तरुण उराळी बाळगताना दिसतो.